# गतीची स्पंदने

साधू या शब्दाची व्याख्या स+अधू म्हणजेच जो अधू आहे त्याच्याबरोबर चालणारा तो साधू, अशी केली जाते. अध्यात्मानुसार, प्रत्येक व्यक्ती नित्य पूर्ण व आनंदस्वरूप असली तरी पूर्णत्वाच्या ज्ञानाच्या अभावामुळे ती स्वत:ला अपूर्ण, पर्यायाने अधूच समजत असते. पूर्णत्वाचे हे ज्ञान त्या व्यक्तीला होईपर्यंत तिला साथ देणारा हा साधूच असतो. त्या त्या व्यक्तीच्या धारणेनुसार हा साधू तिला प्राचीन सद्ग्रंथ किंवा उपासनेसाठी निर्माण झालेल्या ईश्वरी प्रतिमा किंवा सद्गुरू अशा निरनिराळ्या रूपात भेटत असतो. अशा 'साधूं'च्या सत्संगाच्या अभिप्रेत असलेला अर्थ म्हणजे त्या सद्ग्रंथातील विचार कृतीत उतरवणे, त्या त्या ईश्वरी प्रतिमेतील सद्गुण अंगी बाळगवणे, त्यांचा संदेश, त्यांचे विचार यांची संगत धरणे.

वैज्ञानिक दृष्टीने संगतीचा विचार करावयाचा झाल्यास, भौतिक शास्त्रातल्या रेसोनान्स म्हणजे समगती स्पंदनाच्या सिद्धांताचा आधार घेता येईल. संगत शब्दाची फोडसुद्धा सम+गत अशी करता येते. संगत साधणे म्हणजेच समगती साधणे. ही संगत म्हणजे देहाद्वारे साधलेली प्रत्यक्ष संगत नव्हे, तर मनाने साधलेली समगती होय. आधी निर्माण झालेल्या एखाद्या गतीशी समता साधून त्या गतीची स्पंदने स्वत:मध्ये निर्माण करणे म्हणजे संगत करणे.

अधिक स्पष्टीकरणासाठी व्यावहारिक जगातील एक उदाहरण घेता येईल. प्रत्येकाला कोणती ना कोणती तरी व्यक्ती विशेषत्वाने आवडत असते. मग तो एखादा खेळाडू असेल, चित्रपट नायक असेल किंवा अन्य कोणी लोकप्रिय व्यक्ती असेल. ही व्यक्ती काही काळापुरती तरी त्याच्यासाठी आदर्शवत असते. मग तो त्या व्यक्तीची छायाचित्रं गोळा करतो, त्या व्यक्तीविषयी जे काही प्रसिद्ध होईल ते वाचतो, तिने दिलेल्या मुलाखती, भाषणे ऐकतो. शक्य असेल त्या सर्व माध्यमातून तो आपला आदर्श असणाऱ्या त्या व्यक्तीच्या अधिकाधिक जवळ जाण्याचा, तिला जाणण्याचा प्रयत्न करतो. म्हणजेच तो, या सर्व कृतींतून त्या व्यक्तीशी अनुसंधान साधत असतो. नेमकी हीच प्रक्रिया ईश्वरी प्रतीकांशी, अथवा ज्याच्याप्रती श्रद्धा असेल अशा संत-सत्पुरुषाशी अनुसंधान साधले असता घडते. परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजांनी एका अभंगात संगतीचा महिमा वर्णिला आहे.

सदा संतांपाशी जावे।<br>
त्यांचे जवळीं बैसावें।।<br>
उपदेश ते न देती।<br>
तरी ऐकाव्या त्या गोष्टी।।<br>
तेचि उपदेश होती।<br>
त्याही कष्ट नष्ट होती।।<br>
वासुदेव म्हणे संत।<br>
संगे करिती पसंत।।

(थोरले स्वामी महाराज विरचित स्तोत्रादि संग्रह, अभंग क्र. २५८)

इतिहासात, अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ, शिर्डीचे श्री साईबाबा, मालवणचे श्री साटम महाराज अशा कितीतरी सत्पुरुषांची उदाहरणे आहेत, की त्यांनी आपल्या चरित्रात कोणाला विद्वत्ताप्रचुर भाषणे दिलेली किंवा उपदेश दिलेले आढळत नाहीत. परंतु त्यांची केवळ संगत हीच त्या वेळेस त्यांच्यावर श्रद्धा ठेवून त्यांच्या जवळ येणाऱ्यांना तारून नेण्यास समर्थ ठरली, कारण केवळ श्रद्धेच्या आश्रयानेसुद्धा रेसोनेशनच्या तत्त्वानुसार त्या त्या ईश्वरी प्रतीकांतील किंवा श्रद्धास्थानांतील गती स्पंदने मनुष्याला मिळतात आणि त्याद्वारे त्यांच्यातील शक्ती मनुष्याच्या पिंडपेशींमध्ये हळूहळू स्पंदित होण्यास सुरुवात होते. प्रतीकातील शक्ती घेण्याची आणि घेऊन पचवण्याची ताकद येण्यासाठी जी मनाची तयारी लागते तिलाच शरणागती म्हणतात. आपल्या विचारांची गती स्थिर करून शरण भावाने, नम्र भावाने अशा साधूंच्या सन्मुख जाणे म्हणजे शरणागती!

सामान्य मनुष्य जेव्हा देवळात अथवा आपले श्रद्धास्थान असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या दर्शनाला जातो, तेव्हा तो देहाने नमस्कार घालतो, मनाने भौतिक इच्छांचा पाढा वाचतो आणि त्यानंतर काही चमत्कार घडून तत्काळ आयुष्यात काही बदल घडेल ज्यायोगे सुख प्राप्त होईल अशी अपेक्षा करतो. समगती साधण्यासाठी मनातल्या कामनांचा सुद्धा अडसर निर्माण होत असतो. वस्तुत: विनाशर्त आणि विनाअट निर्माण झालेली श्रद्धा ही त्या व्यक्तीला त्या त्या प्रतीकातील शक्ती ग्रहणासाठी पात्र करीत असते.

अध्यात्माला अपेक्षित असलेल्या खऱ्या सत्संगाची व्याप्ती याहून फार मोठी आहे. सत्संग म्हणजे सत्याचा संग. ज्याचे अस्तित्व त्रिकालाबाधित असते, तेच सत्य होय. अद्वैत सिद्धांतात विश्वाच्या मिथ्यत्वाची संकल्पना मांडण्यात आली आहे. त्यात दृश्य विश्वाला, संसाराला कोठेही असत्य किंवा खोटे असे न म्हणता 'मिथ्या' असे म्हटले आहे. असत्य म्हणावे तर प्रतीतीस येते आणि सत्य म्हणावे तर सतत परिवर्तनशील असल्याने काळाने अबाधित नाही असेही अनुभवास येते, म्हणून ते 'मिथ्या' म्हणजेच भासमान आहे, अशी ती संकल्पना आहे. विश्वाच्या या फाफटपसाऱ्यात, संसाराच्या या रहाटगाडग्यात, एकच गोष्ट त्रिकालाबाधित असते, ती म्हणजे प्रत्येक प्राणीमात्राच्या देहातील चैतन्याचे अस्तित्व. या चैतन्याच्या देह नामक बाह्य आवरणांचे फक्त रूपांतरण होत राहाते, मूळ चैतन्याचा नाश कधीही होत नाही. या सत्याची जाणीव जेव्हा आपल्या मनात आपण सदैव जागृत ठेवू, तेव्हा तोच खरा सत्संग म्हणजेच सत्याचा संग असतो.

सर्व संत, सत्पुरुष, ईश्वरी प्रतीके आणि सद्ग्रंथ निर्माण करणारे आपले प्राचीन समाजधुरीण यांनासुद्धा प्रत्येकाने आपल्या जीवनाला परमअर्थ प्राप्त करून देण्यासाठी, आपल्याला आवडेल त्यानुसार त्या विचारांची, त्या व्यक्तीची, त्या प्रतीकाची संगत धरून त्याद्वारे हा अंतिम सत्याचा संग साधावा हेच अपेक्षित होते, कारण प्रत्येक सत्संगाचे तेच अंतिम साध्य आहे.

(वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर, खोपोली स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत. संपर्क : bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी